*Annexure IX (24), (Vide Article - 9.01 (xxvii))*

**राज्यात व्याघ्र कक्षाची स्थापना करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**महसूल व वन विभाग ,**
**शासन निर्णय क्रमांक:-डब्ल्यूएलपी-१०-२०००/प्र.क्र.१०/फ-१,**
मंत्रालय, मुंबई ४००० ३२
दिनांक :- ७ नोव्हेंबर २०००

**प्रस्तावना:-**

वन्यजीव संरक्षणाकरिता अधिकाधिक प्रभावी उपाययोजना करण्याची गरज आहे. वन्यप्राणी विषयक गुन्हयास प्रतिबंध घालण्यासाठी तथा होणा-या गुन्हेकामी त्वरेने तपास करुन गुन्हेगारांना कडक शासन होण्यासाठी शासनाच्या सर्व संबंधित खात्यामध्ये पूर्ण समन्वय साधणे निकडीचे आहे.मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन हवाई मार्गे वाहतूक होणा-या वन आणि वन्यजीव आधारीत वस्तुंवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र शासनाने क्षेत्रीय उपसंचालक (वन्यजीव), पश्चिम विभाग, मुंबई या भारतीय वन सेवेतील अधिका-याच्या अधिपत्याखाली तपासणी पथक कार्यरत केलेले आहे. राज्य शासनानेही वने व वन्यजीव संरक्षणासाठी यंत्रणा उभी केली आहे. हा सर्वांच्या जिव्हाळयाचा विषय असल्याने सर्व संबंधित शासकीय खात्यांनी एकत्र येऊन समन्वयाने काम केल्यास अधिक परिणामकारक ठरेल. हया सर्व बाबी साध्य होण्याच्या दृष्टीने राज्यात पुढील उद्दिष्टे पूर्ण होणे आवश्यक आहे.

१) वाघाची अवैध शिकार व वाघाच्या अवयवांचा अवैध व्यापार वा ने-आण करण्यावर आळा घालणे,

२) वाघाव्यतिरिक्त अन्य प्रमुख वन्य प्राण्याच्या अवैध शिकारीवर व त्यांच्या अवयवांच्या अवैध व्यापारावर आळा घालणे,

३)वन्यप्राण्यांची अवैध शिकार/तस्करी करणा-या संशयितांची यादी तयार करुन त्यांच्या कारवायांवर नियंत्रण ठेवणे,

४)वन्यप्राण्यांच्या अवैध शिकार/तस्करीस संपूर्ण आळा घालण्याच्या दृष्टीने संबंधित शासकीय विभाग/खात्यांमध्ये समन्वय साधणे, तसेच प्रशिक्षणासारख्या उपलब्ध साधनांचा वापर करणे,

५) राज्याच्या सीमावर्ती भागात समन्वय साधण्याच्या दृष्टीने योजना तयार करुन राबविणे

६)सर्वसामान्य जनतेमध्ये वाघ व इतर वन्य प्राण्यांच्या संरक्षणाच्या आवश्यकतेबाबत उपलब्ध माध्यमातून जागृती करणे व त्यासाठी सुयोग्य योजना तयार करुन राबविणे,

७) शेजारच्या राज्यांचे विशेषत: मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात, कर्नाटक , गोवा यांचे वन्य प्राण्यांच्या अवैध व्यापारास आळा घालण्यासाठी सहकार्य मिळविणे,

आता या शासन निर्णयान्वये राज्यात वरील उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी व्याघ्र कक्षाची स्थापना खालीलप्रमाणे करण्यांत येत आहे. निसर्गात व्याघ्र हा अन्नसाखळीचा शीर्ष प्राणी असून त्याचे अस्तित्व धोक्यात आहे त्यामुळे त्याच्या संरक्षणासाठी सर्व वन्यप्राण्याचे संरक्षण आवश्यक आहे. म्हणून या कक्षाचे नांव व्याघ्र कक्ष ठेवण्यांत येत आहे .

शासन निर्णय:-

वन्यजीव संरक्षणाची वाढती गरज लक्षात घेता वन्यप्राण्यांविषयी होणा-या गुन्हयांचा वेळीच शोध घेऊन आणि त्याचा त्वरेने तपास करुन गुन्हेगारांना कडक शासन होण्यासाठी पोलीस विभाग, वन विभाग तसेच इतर संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय साधण्यासाठी व्याघ्र कक्षाची निर्मिती करण्यांत येत आहे. सदर कक्षात खालीलप्रमाणे दोन समित्या स्थापित करण्यांत येत आहे.

१. **राज्यस्तरीय समिती.**

| | |
|---|---|
| १. अतिरिक्त पोलीस महानिदेशक (मुख्यालय) | अध्यक्ष |
| २. मुख्य वनसंरक्षक(वन्यजीव),महाराष्ट्र राज्य,नागपूर | सहअध्यक्ष |
| ३. वनसंरक्षक(वन्यजीव), नागपूर | सदस्य सचिव |

सदर समितीची कामे/कर्तव्ये पुढीलप्रमाणे राहतील .

१) महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाचे व्याघ्र कक्षाशी संबंधित विभाग यांच्यात समन्वय प्रस्थापित करणे,

२) शासनास वेळोवेळी व्याघ्र कक्षाच्या कामाची / प्रगतीची माहिती देणे,

३) शेजारी राज्यातून वन्य प्राण्यांच्या अवयवांची अवैध व्यापार/ तस्करी रोखण्यासाठी समन्वय साधण्याच्या दृष्टीने संबंधितांची बैठक घेणे,

४) व्याघ्र कक्षाची कार्यतत्परता वाढविण्यासाठी उपयुक्त ठरु शकतील अशा राज्यांतर्गत व राज्याबाहेरील सर्व शासकीय, निम शासकीय तथा सामाजिक संस्थांमध्ये संपर्क साधून व्याघ्र कक्षाची कार्यतत्परता वाढविणे,

५)संवेदनशील क्षेत्रांची निवड करुन महसूल विभाग स्तरीय समितीस मार्गदर्शक अशी योजना तयार करणे,

६) राज्यातील वाघांची संख्या व वाघासंबंधीची इतर आवश्यक आकडेवारी अद्ययावत ठेवणे व वाघांच्या संख्येचा विश्लेषण करणे,

७) दूरदर्शन, आकाशवाणी, वृत्तपत्रे इ. माध्यमातून व्याघ्र कक्षाच्या कार्याची माहिती सर्वसामान्य जनतेस देण्यासाठी आवश्यक योजना तयार करुन कार्यान्वित करणे.

योग्य समन्वयासाठी व समितीच्या कार्यात सुसूत्रता व वेग आणण्यासाठी समितीची बैठक सहा महिन्यातून किमान एकदा आयोजित करावी.

२. **महसूल विभागस्तरीय समिती .**

| | |
|---|---|
| १. संबंधित विशेष/ क्षेत्रीय पोलीस महानिरीक्षक | अध्यक्ष, |
| २. संबंधित वनसंरक्षक (वन्यजीव) | सदस्य सचिव, |
| ३. संबंधित वनसंरक्षक.(प्रादेशिक) | सदस्य |

सदर समितीची कर्तव्ये /जबाबदा-या पुढीलप्रमाणे राहतील.

१) राज्यस्तरीय समितीने मागविलेली माहिती वेळोवेळी त्यांना उपलब्ध करुन देणे,

२) वन्यजीव संरक्षण अधिनियमाशी संबंधित न्यायालयीन प्रकरणे योग्य रितीने हाताळण्यात येत आहेत याची काळजी घेऊन व आवश्यकतेनुसार राज्यस्तरीय समितीस अहवाल सादर करणे,

३) संशयित अवैध शिकारी व व्यापारी व्यक्तींची तसेच इतर संबंधितांची संपूर्ण माहिती अद्ययावत करणे व त्याबाबत अहवाल तयार करणे,

४) सदर अहवाल तयार केल्यावर अशा व्यक्तीवर सतत नजर ठेवण्यासाठी आवश्यक योजना तयार करुन राबविणे,

समितीने तीन महिन्यातून किमान एक बैठक आयोजित करुन वन्यप्राण्यांच्या अवैध शिकारीबाबत झालेल्या कामाचा आढावा घ्यावा व पुढील कार्यक्रमाची रुपरेषा ठरवावी.

सदर शासन निर्णय गृह विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(संजीव गौड)**
**विशेष कार्य अधिकारी,**
**महसूल व वन विभाग**

**प्रति,**

मा. मुख्यमंत्र्यांचे सह सचिव,मंत्रालय, मुंबई.
मा. उप मुख्यमंत्र्यांचे उप सचिव,मंत्रालय, मुंबई.
मा. गृह मंत्र्यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (गृह विभाग) मंत्रालय, मुंबई.
प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
पोलीस महानिदेशक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
अतिरिक्त पोलीस महानिदेशक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विभागीय आयुक्त (सर्व)
मुख्य वनसंरक्षक (सर्व)
पोलीसआयुक्त मुंबई/ठाणे/पुणे/नागपूर/नवी मुंबई/नाशिक/औरंगाबाद/सोलापूर/अमरावती
विशेष पोलीस महानिरीक्षक ठाणे/नागपूर/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नांदेड/कोल्हापूर
वनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व
वनसंरक्षक (वन्यजीव) सर्व
पोलीस अधिक्षक (सर्व)
उप वनसंरक्षक(वन्यजीव) सर्व